बुधवार,
६ एप्रिल २०२२

# हळबे महाविद्यालयाचा ॲप ब्रँड बनेल

## अभिजित हेगशेट्ये: पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. ५: येथील हळबे महाविद्यालाचा माजी विद्यार्थ्यांचा ॲप उद्या जगाचा ब्रँड बनेल, असे प्रतिपादन संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी येथे केले.

दोडामार्ग सारख्या दुर्गम दुर्लक्षित आणि विकासापासून कोसों दूर असलेल्या भागातील आमच्या विद्यार्थ्याने बनवलेला युवा फेस सारखा ॲप उद्याच्या जगाचा ब्रँड बनेल आणि जगभरातील लोक दोडामार्गला शोधत येतील, अशी भावना श्री. हेगशेट्ये यांनी व्यक्त केली. येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी ते बोलत होते.



दोडामार्गः येथे बक्षीस वितरण करताना अभिजित हेगशेट्ये.

मांगेली सारख्या दुर्गम गावातील माजी विद्यार्थी महेश गवस यांनी युवा फेस नावाचे ॲप तयार करून ते बाजारात आणले आहे. ते फेसबुकला पर्याय ठरत आहे. या ॲपच्या निर्मितीनंतर अनेक ठिकाणचे लोक महेश गवस यांच्या ॲप्स चे कौतुक करीत आहेत. डिजिटल इंडिया आणि डिजिटल फर्स्ट म्हटले जात असले तरी आजही आपण अनेक वस्तू साधनं आणि संशोधनासाठी इतरांवर अवलंबून असताना आमच्या माजी विद्यार्थ्यांनी बनवलेले ॲप हे येणाऱ्या काळात क्रांती करेल, असे सांगून सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी याचा वापर करावा, असे आवाहन हेगशेट्ये यांनी केले. श्री. गवस यांनी युवा फेसबद्दल माहिती सांगून यातून विद्यार्थ्यांनी लर्न आणि अर्न कसे करावे या संदर्भात माहिती दिली. त्यानंतर माजी विद्यार्थी आणि पत्रकार तेजस देसाई यांनी शिक्षणाला जगण्याचे साधन न बनवता मन आणि बुद्धीच्या विकासाचा ज्ञानाचे केंद्र बनावे असे सांगितले.

यावेळी महेश गवस व तेजस देसाई या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. दोघांचाही सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये यांच्या हस्ते करण्यात आला. कोरोनाचा काळ संपल्याबरोबर घेण्यात आलेल्या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय खडपकर यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. गौरेश कर्पे यांनी मानले.